नि. फौ. ख. क्र. **<u>१९५/२०२५</u>**
सरकार वि. मनोज अरूण
**निशाणी १२**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : गजानन पांडुरंग भांडे,
वय : ५९ वर्षे,
धंदा : शेत मजुरी,
राहणार : दहिहांडा, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

दहिहांडा पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते. माझेसमक्ष कोणत्याही पंचनाम्याची कारवाई पोलीसांनी केली नाही. आता मला घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा दाखवला. त्यावर अनु क्र. १ वर माझी सही आहे परंतु मला त्यातील मजकुर मला माहित नाही. मला सदर मजकुर वाचुन दाखवण्यात आलेला नव्हता. पोलीसांनी माझी सही मागितली म्हणुन मी सदर सही केली.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०५/०३/२०२५ रोजी दहिहांडा पोलीसांनी मला दहिहांडा गावी जामा मस्जिदसमोर घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार करण्यासाठी

बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याठिकाणी माझेसमक्ष आरोपी याचे ताब्यातुन एक लोखंडी सुरा जप्त केला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने देखील माझेसमक्ष सदर पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा मी वाचुन त्यावर घटनास्थळी सही केली होती.

३. हे म्हणणे खरे आहे की, कुठलाही दस्त समजुन घ ेतल्याशिवाय त्यावर मी त्यावर सही करत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीला ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपीतर्फे ॲड. श्री. आर. आर. पळसपगार यांनी नाकारली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. १४.०७.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.